


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : १५९ वा मंगळवार दि. ०५ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# राज्यात काँग्रेसला गळती, पण पवारांचा हुकमी एक्का देणार हाताची साथ; पक्षात नवचैतन्य...

**वृत्तसंस्था/ परभणी**

देशपातळीवर भारतीय जनता पक्षाच्या विरोधात काँग्रेस पक्ष लढा देत आहे. राज्य पातळीवर प्रादेशिक पक्षांना भाजप वेगवेगळ्या मार्गाने संपवत असल्याचा आरोप होतो. त्याचबरोबर खासदार राहुल गांधी हे भाजप विरोधात ठामपणे भूमिका मांडत आहे. सध्या देशातील अल्पसंख्यांक समाज हा असुरक्षित असल्याची भावना व्यक्त करत आहे आणि देशपातळीवर काँग्रेसच अल्पसंख्यांक समाजाला न्याय देऊ शकेल, असे विधान वारंवार केले जाते. त्यामुळे काँग्रेसमध्ये आता बड्या नेत्याचा पक्षप्रवेश होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी आमदार बाबाजी यांनी दुर्राणी हे पवारांचे खास विश्वासू मानले जातात. काँग्रेस फ ुटल्यानंतर जेव्हा राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली, त्यावेळेस बाबाजानी दुर्राणी यांनी शरद पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून आजतगायत बाबाजानी दुर्राणी यांनी शरद पवारांची साथ सोडली नाही. मध्यंतरी लोकसभा निवडणुकीच्या वेळेस ते अजित पवार गटामध्ये गेले होते, पण पुन्हा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दुर्राणी हे शरद पवारांकडेच परतले. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पाथरी विधानसभा मतदारसंघातून बाबाजानी दुर्राणी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारीची मागणी केली होती. पण पाथरी विधानसभा मतदारसंघ सोडून घेण्यास शरद पवार यशस्वी झाले नाहीत आणि त्यांना बंडखोरी करून अपक्षपणे निवडणूक लढवावी लागली आणि या निवडणुकीत दुर्राणी यांचा पराभव झाला. त्यानंतर बाबाजानी दुर्राणी हे पुन्हा एकदा अजित पवार गटांमध्ये जातील अशा चर्चा सुरू होत्या. पण आता त्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे परवा दिवशी सात ऑगस्ट रोजी मुंबई येथील काँग्रेस भवन येथे माजी आमदार बाबाजानी दुर्राणी हे आपल्या शेकडो समर्थकांसह काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा होणार असल्याचे दुर्राणी यांनी सांगितले आहे.त्यामुळे जिल्ह्यामध्ये आता काँग्रेसची ताकद वाढणार आहे. काही दिवसांपूर्वीच परभणी जिल्ह्यातील काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार सुरेश वरपूडकर यांनी काँग्रेसला रामराम ठोकत भाजपामध्ये प्रवेश केला. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील काँग्रेस नामशेष होते की काय असा प्रश्न उपस्थित होत असतानाच बाबाजानी दुर्राणी यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. यामुळे जिल्ह्यातील काँग्रेसला नवचैतन्य मिळाले आहे. माजी आमदार बाबाजानी दुर्रानी हे जिल्ह्यातील अल्पसंख्यांक समाजाचे मोठे नेते आहेत. परभणी जिल्ह्यातील मुस्लिम समाजासोबतच ओबीसी आणि मराठा समाजामध्ये देखील दुर्राणी यांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे वरपूडकरांची उणीव बाबाजानी हे भरून काढणार यामध्ये कसल्याही प्रकारची शंका नाही.



काँग्रेस पक्षाच्या प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर बाबाजानी दुर्राणी यांनी शरद पवारांची साथ सोडत असल्याचे सांगितले त्याला कारणही तसेच दिले की राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन तुकडे हे भाजपनेच केले आणि राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे आता कुठेतरी देशपातळीवर अल्पसंख्यांक समाजाला सुरक्षित वाटणारा एकच पक्ष म्हणून काँग्रेस राहिला आहे आणि त्यामुळेच आम्ही काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहोत आणि शरद पवारांची साथ सोडत असल्याचे दुर्राणी यांनी स्पष्ट केले. माजी आमदार बाबाजानी दुर्राणी हे परभणी जिल्ह्यातील मातब्बर प्रस्थ आहे अल्पसंख्यांक समाजासह मराठा आणि ओबीसी समाजामध्ये त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. राजकीय क्षेत्रात शरद पवार यांचे विश्वास म्हणून त्यांची ओळख देखील आहे. बाबाजानी दुर्राणी यांनी आपली राजकीय कारकिर्दीची सुरुवात पाथरी नगर परिषदेच्या सदस्य पदापासून सुरू केली नंतर ते पाथरी नगरपरिषदेचे अध्यक्ष देखील झाले. २००४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत त्यांनी पाथरी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस कडून निवडणूक लढवली आणि जिंकली देखील. त्यानंतर २०१२ मध्ये बाबाजानी दुर्राणी यांनी परभणी हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले. त्यानंतर १० जुलै २०१८ रोजी ते महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून पुन्हा एकदा बिनविरोध निवडून आले. मध्यंतरी त्यांनी वक्फ बोर्डाचे सदस्य पद देखील भूषवले. त्याचबरोबर परभणी जिल्ह्याच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष पद देखील त्यांनी सांभाळले. बाबाजानी दुर्राणी यांच्या कार्यकाळातच परभणी जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसला चांगले दिवस आले होते. जिल्हा परिषद नगरपालिका पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने चांगली मजल मारली होती.

# पैसे आणि दागिन्यांसाठी लग्नाचा बनाव; युवकाची फसवणूक पोलिसांनी केली चौघांना अटक; दोघांचा शोध सुरू

**जनसंचलन/ धाड**

लग्नाच्या नावावर बनावट कागदपत्रांच्या आधारे २८ वर्षीय तरुणाची विवाहित महिलेशी फसवणूक करून लग्न लावण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार धाड येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी संबंधित व्यक्तींनी पैसे व दागिने घेऊन फसवणूक केल्याची तक्रार युवकाने धाड पोलिस ठाण्यात दाखल केली असून, पोलिसांनी तत्काळ कारवाई करत चार आरोपींना अटक केली आहे. उर्वरित दोघांचा शोध सुरू आहे. वैभव विठ्ठल माळोदे (वय २८, रा. धाड) या तरुणाने दिलेल्या तक्रारीनुसार, काही व्यक्तींनी संगनमत करून त्याला लग्नासाठी मुलगी असल्याचे सांगितले. पसंतीनंतर त्याच्याकडून पैसे व दागिने घेत कोमल दिलीप पाटील (रा. इंदिरानगर, शेगाव) या विवाहित महिलेशी त्याचे लग्न लावण्यात आले. या फसवणूक प्रकरणात नितीन भरत जमधाडे (रा. नाशिक), अक्षय देवराज गजभरे (रा. पुसद, जि. यवतमाळ) आणि प्रतिभा ऊर्फ हिरा विकी गांगुर्डे (रा. पेंढुर्ली, ता. सिन्नर, जि. नाशिक) यांचा सहभाग असल्याचे उघड झाले आहे. आरोपींना न्यायालयीन कोठडी सर्व आरोपींना सोमवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने ८ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा तपास धाडचे ठाणेदार आशिष चेचरे, पीएसआय परमेश्वर केंद्रे आणि त्यांच्या पथकाकडून करण्यात येत आहे. या प्रकरणातील फरार असलेल्या नितीन भरत जमधाडे, अक्षय देवराज गजभरे या दोघा फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. लग्नाच्या माध्यमातून फसवणूक करणारी टोळी सक्रीय असल्याचे पोलिस तपासात येत आहे पुढे त्यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे ही फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. कोमल पाटीलला ताब्यात घेऊन पोलिसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत ही एक संगठित फसवणूक रॅकेट असल्याचे स्पष्ट झाले. यानुसार पोलिसांनी कोमल पाटील, योगेश माधव थोरात, प्रतिभा ऊर्फ हिरा गांगुर्डे आणि साक्षी गणेश कालाप या चार आरोपींना अटक केली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अवकाशातील शक्तिशाली डोळा

## संपादकीय लेख

इस्रो आणि नासा या दोघांनी मिळून अवकाशात सोडलेला ङ्ग निसार म (नासा-इस्रो सिंथेटिक ॲपर्चर रडार) हा उपग्रह म्हणजे वसुंधरेवर अखंड लक्ष ठेवणारा, बारीकसारीक बदल टिपणारा, लहानातली लहान घडामोड ताबडतोब अचूकपणे नोंदविणारा एक खबऱ्याच आहे. पृथ्वीवरच्या दोन टोकांवर असणाऱ्या देशांनी एकत्र येऊन त्याची निर्मिती केली आहे आणि संपूर्ण मोहीमसुद्धा ते एकत्रच राबवणार आहेत. परवाच्या ३० जुलैला अवकाशात झेप घेतलेला हा उपग्रह, आत्ता पृथ्वीपासून ७३७ किमी अंतरावर आहे. त्याला आता ७४७ किमी अंतरावर न्यायचे आहे. हे काम करायला ४५ ते ५० दिवस लागतील. एकदा तो अपेक्षित स्थानी पोचला की त्याच्यावरचे रडार कार्यान्वित करण्यात येतील. त्यानंतर ते आपले काम सुरू करील. पृथ्वीवरची जमीन, पाणी, बर्फ यावर घडणाऱ्या घडामोडींची माहिती गोळा करत राहील. पर्यावरणात होणारे बदलही हा उपग्रह टिपेल. मुख्य म्हणजे पृथ्वीवरील हवामान कसेही आणि कितीही पालटले, तरीही या उपग्रहाची ङ्गनजरफ ते सारे अडथळे पार करून आरपार जाईल आणि जमिनीवर काय चालले आहे, त्याची नोंद करत राहील. पृथ्वीवर सतत बदल घडत असतात. या बदलांमधील काही नैसर्गिक असतात तर काही माणसामुळे होत असतात. गेल्या काही वर्षांमध्ये माणसाची वस्ती ङ्गधोकादायकफ म्हणता येईल, अशा जागीसुद्धा होऊ लागली आहे. धोकादायक म्हणजे कोणती ठिकाणे? तर हवामानातील बदलांमुळे सागराची सरासरी पातळी वाढत आहे. या वाढत्या पातळीचा ज्या सागर किनाऱ्यांना फटका बसणार आहे, अशा किनाऱ्यांनजीकही मानवी वस्ती झाली आहे. मुंबई आणि परिसराकडे नजर टाकली तरी याचे प्रत्यंतर आपल्याला येते. अशा ठिकाणांसोबतच भूकंपप्रवण जागा, भूस्खलन होण्याची शक्यता असणारी ठिकाणे, अशा जागांवर हा उपग्रह नजर ठेवेल. अशा ङ्गधोकादायकफ ठिकाणांमध्य होत असलेले बदल टिपण्याची, त्याबाबत अधिकाधिक माहिती गोळा करण्याची आता नितांत गरज आहे. किनारपट्टीवर होणारे बदल, समुद्रातील विविध प्रवाह, समुद्रावरील वाऱ्याची गती, समुद्रात होणारी तेलगळती या घटकांची माहिती गोळा करण्याचे कामही ङ्गनिसारफकरील. पृथ्वीवरील बर्फाळ प्रदेश, ध्रुवीय प्रदेश, हिमाच्छादित पर्वत या साऱ्यांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये बदल होत आहेत. अलीकडच्या काळात हे बदल अधिक वेगाने होत आहेत. या बदलांचे संभाव्य परिणाम भीषण असतील. ते टाळावयाचे, तर या सर्वच भागांत सतत होणारे बदल टिपणे आणि त्याबाबतची माहिती अद्ययावत करत राहणे महत्त्वाचे आहे. याचे कारण त्यातूनच आपल्याला ङ्गउद्या काय होऊ शकेलफयाची नीट कल्पना येईल आणि संभाव्य दुष्परिणाम टाळण्यासाठी वेळीच हालचाली करता येतील. थोडक्यात काय, तर हा उपग्रह आपल्या पृथ्वीच्या भूपृष्ठाची, त्यावरील पाणी आणि बर्फ यांची माहिती देत राहील. मुख्य म्हणजे दक्षिण ध्रुवावरील बदलांची माहिती मिळत राहील. ङ्गनिसारफद्वारे मिळणाऱ्या या माहितीमुळे संभाव्य नैसर्गिक आपत्ती आणि मनुष्यनिर्मित संकटे यांच्याशी सामना करण्यासाठी आवश्यक ती तयारी करणे संबंधित देशांच्या सरकारांना शक्य होईल. तसेच हे धोके टाळण्यासाठी काय करता येईल, याचा विचार करून आवश्यक त्या हालचाली करता येतील. उदाहरणार्थ, भूकंपप्रवण भागाची माहिती ङ्गनिसारफमुळे सतत मिळत राहील. त्यामुळे तेथील भूकवचाच्या हालचालींचा अभ्यास करता येईल. त्या अभ्यासातून भूकवचात होणारे बदल समजू शकतील. भूकंपांप्रमाणेच ज्वालामुखींचा उद्रेकही संहारक ठरू शकतो. ज्वालामुखींच्या बदलांतील माहितीमुळे त्यांच्या उद्रेकाचा अंदाज बांधणे शक्य होईल. प्रदूषण आणि त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम, जागतिक पातळीवरच हवामानात होत असलेले बदल आणि त्याचे जागोजागी दिसू लागलेले परिणाम या गोष्टी आता नवीन नाहीत. पर्यावरणीय माहिती गोळा करत राहणे आणि त्याचा अभ्यास करणे हा संभाव्य धोके टाळण्याचा एक मार्ग आहे. अशी उपयुक्त माहिती सतत मिळत राहणे यापूर्वी अशक्य होते; पण आता ङ्गनिसारफ हे काम करणार आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने जंगलांचे महत्त्व खूपच मोठे आहे. तर या वनांचा, तेथील बदलांचा, तेथील घडामोडींचा, माणसाच्या उपद्व्यापांचा वेध आता घेता येणार आहे. अगदी घनदाट अरण्याचाही, म्हणजे भर माध्यान्हीला जिथे सूर्याचे किरण भूमीला स्पर्श करू शकत नाहीत, अशा ठिकाणाचासुद्धा वेध घेणे ङ्गनिसारफक्कडच्या एल बँड रडारमुळे शक्य होणार आहे. तर एस बँड रडारमुळे जगभरातल्या शेतीवर, तेथील पिकांवर लक्ष ठेवता येणार आहे. ङ्गनिसारफ हा २३९२ किलो वजनाचा उपग्रह, अमेरिकेची नासा आणि भारताची इस्रो या अवकाश संशोधन करणाऱ्या दोन संस्थांच्या सहकार्याने तयार झाला आहे. या मोहिमेसाठी नासाने सुमारे ११६ कोटी अमेरिकी डॉलर, तर इस्रोने नऊ कोटी अमेरिकी डॉलर खर्च केले आहेत. पृथ्वीवरची जमीन, तिथली वनराजी आणि बर्फाळ प्रदेश यांच्यामध्ये होत असलेल्या बदलांचा अभ्यास करण्यासाठी अवकाशात उपग्रह पाठविण्याची आवश्यकता आहे, अशी कल्पना सन २००७ मध्ये पहिल्यांदा अमेरिकेने मांडली. पृथ्वीच्या भूकवचात होणाऱ्या बदलांचा मागोवा घेत राहिले, तर तर त्याचा फायदा भूकंपांचा, भूस्खलनांचा, ज्वालामुखींचा अभ्यास करताना होईल. हा अभ्यास आपल्याला हवामानातील बदल, जागतिक पातळीवरील कार्बनचे चक्र, वृक्षसंपदा, हिमाच्छादित प्रदेश यांच्या सखोल अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल, असे ङ्गनासाफ्चे म्हणणे होते. त्यानुसार या प्रकल्पावर ङ्गनासाफ्ने २००८मध्ये काम करण्यास सुरुवात केली. त्या दरम्यान असे लक्षात आले, की या मोहिमेच्या उद्दिष्टांमध्ये विज्ञानविषयक अभ्यासाची आणि त्या अभ्यासाचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग करण्याची संधी आहे. हे ध्यानात येताच इस्रोने २०१२मध्ये या प्रकल्पात सहभागी होण्याचे ठरवले. यापूर्वी चांद्रयान-१मध्ये नासा सहभागी झाली होती. त्या वेळी ङ्गनासाफ्चे एक उपकरण घेऊन २२ ऑक्टोबर २००८ या दिवशी भारताचे चांद्रयान-१ चंद्राकडे झेपावले होतं. पण ती मोहीम सर्वस्वी इस्रोची होती. त्या मोहिमेत नासाचे एक उपकरणं घेऊन जाणे इतकाच मर्यादित सहभाग नासाचा होता. ङ्गनिसारफ्साठी मात्र २०१४मध्ये नासा आणि इस्रोमध्ये एक करार झाला. एकाच उपग्रहावर दोन वेगळ्या कंप्रतांचे (फ्रिक्केन्सीज) रडार (सिंथेटिक अपाचर रडार्स-सार) बसवणे आणि त्यांच्याकडून नियमितपणे काम करून घेणे, पृथ्वीवरील प्रत्येक जागेचा दररोज ठरावीक वेळेस वेध घेणे (सन सिंक्रोनस ऑर्बिट), दाट धुके, तुफान पाऊस, धुळीचे वादळ... यासारख्या कोणत्याही प्रकारच्या हवामानामुळे कामात अडथळा येणार नाही, अशा क्षमतेची यंत्रणा उपग्रहावर असणे, अशा अतिप्रगत विज्ञान-तंत्रज्ञानाचाच हा आविष्कार आहे. त्या आविष्कारातून संपूर्ण मानव जातीचा एक शक्तिशाली डोळा आता अवकाशातून अखंडपणे टेहळणी करणार आहे. पृथ्वीच्या दोन अगदी वेगळ्या भागांत असलेल्या देशांतील संशोधन संस्थांच्या सहकार्यातून हे सारे घडणार आहे. विज्ञान-तंत्रज्ञानातील उच्च कोटीच्या संशोधनासाठी अशा सहकाऱ्याचीच आता गरज आहे, ही बाब या मोहिमेने अधोरेखित केली आहे. ती महत्त्वाची आहे.

# माधुरीचा प्रश्न मार्गी लागणार? मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा

वृत्तसंस्था/ मुंबई

नांदणी मठातील (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) माधुरी हत्तीण पुन्हा नांदणीत यावी, अशी जन भावना आहे. ही जनभावना लक्षात घेऊन नांदणी मठाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी. राज्य शासनही स्वतंत्र पुनर्विचार याचिका दाखल करून सर्वोच्च न्यायालयात हत्ती परत देण्यासंदर्भात भूमिका मांडेल, असे सांगून याप्रकरणी राज्य शासन पूर्णपणे मठाच्या पाठीशी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नांदणी मठ (ता. शिरोळ, जिल्हा कोल्हापूर) येथील माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीच्या प्रश्नासंदर्भात मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, वन मंत्री गणेश नाईक, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वैद्यकीय मंत्री हसन मुश्रीफ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह नांदणी मठाचे प्रतिनिधी तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते. नांदणी मठाच्या परंपरा आणि स्थानिक जनतेच्या भावनांचा विचार करून कायदेशीर प्रक्रिया मार्गाने माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीला पुन्हा मठात परत आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, गेल्या ३४ वर्षांपासून माधुरी हत्तीण नांदणी मठात आहे. माधुरी पुन्हा मठात यावी ही जन भावना आहे. ही जन भावना लक्षात घेऊन राज्य शासन पुनर्विचार याचिका दाखल करेल. मठानेही आपल्या याचिकेमध्ये राज्य सरकारचाही समावेश करावा. तसेच वन विभागाच्या वतीने सर्वोच्च



न्यायालयात स्वतंत्र सविस्तर भूमिका मांडण्यात येईल.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुट्टीत काय करायचं?



कॉलेजच्या परीक्षा संपल्यावर येणाऱ्या मोठ्या सुट्टीत नेमकं काय करायचं? हा प्रत्येकालाच पडलेला प्रश्न असतो. घरी नुसतं लोळत पडण्यापेक्षा किंवा मित्र-मैत्रिणींसोबत चकाट्या पिटण्यापेक्षा स्वत:ला उपयोगी पडेल असं काहीतरी करावं, असं आपल्याला वाटत असतं. पण नेमकं काय करायचं हा विचार संपता संपत नाही, पण तेवढ्यात सुट्टी मात्र संपत येते. तुमच्यावर ही वेळ येऊ नये म्हणून आम्ही तुम्हाला थोडी मदत करणार आहोत.

कॉलेजच्या परीक्षा संपल्यात आणि भलीमोठ्ठी दोन-अडीच महिन्यांची सुट्टी आता समोर ठाकली आहे. वर्षाअखेरच्या या परीक्षेनंतरची ही मोठी सुट्टी म्हणजे आपल्या सर्व ग्रुपसमोरच एक भलामोठ्ठा प्रश्न असतो, नाही का? या सुट्टीत ग्रुपची काही काळापुरती का होईना ताटातूट होणार असते. एवढे दिवस ग्रुपशिवाय राहायचं म्हणजे शिक्षाच जणू.. त्यामुळेच ग्रुपशिवाय ही सुट्टी काढायची कशी ही चिंता सतावत असते.

एकूणच ही उन्हाळ्याची सुट्टी खूप सारे प्रश्न घेऊन येते. पण सर्वात मोठा प्रश्न हाच असतो की, या सुट्टीत करायचं काय? घरी पालक, कुटुंब यांच्याबरोबर वेळ काढू, त्यांच्यासोबत सहलीला जाऊ, पण अखेर किती काळ तुम्ही घरात राहणार? अर्थात वर्षभर अभ्यास करून आता थोडं रिलॅक्स करायचे हे दिवस आहेत म्हणा, ते जरुरी पण आहेच. सुट्टीत टाईमपास इज मस्ट!

आता तुम्ही हवं ते करायला अगदी मोकळे आहात. तेव्हा तुम्हाला हवं ते वाचा, हवं तिथे जा, हवी ती मजा करा, कोणीही अडवणार नाहीये. सुट्टी सुरू झाली की मित्र-मैत्रिणींसोबत टाईमपास काय करायचा हे तर पहिल्यापासूनच ठरलेलं असतं, मग त्यात मूव्ही असतो, पार्टी असते, एखाद्या अम्युझमेंट पार्कला भेट असते, खाऊपिऊगिरी असते, अशी सर्व धम्माल तर योजूनच ठेवलेली असते.

पण थोडं रिलॅक्स झाल्यानंतर आणि ही सर्व मजामस्ती करून झाल्यानंतर पुढे काय? अनेकांचे आई-बाबाही दिवसा घरी नसतात, तेव्हा घरी बसून करणार तरी काय असा मोठ्ठा प्रश्न पडतो. मग अंगावर चालून येतो मोठ्ठा कंटाळा. अखेर झोपा काढून काढून तरी किती काढणार ना? तेव्हा या सुट्टीत आई-बाबा किंवा मोठ्या भावंडांच्या पाठी माझ्यासाठी वेळ काढा असा धोशा लावण्याऐवजी तुम्हीच तुमच्या वेळेचा छानसा उपयोग का नाही करत? नाही तरी कोणीतरी म्हटलेलंच आहे की, शिकण्याचा एकही क्षण फुकट घालवू नका व आपण तर अजून विद्यार्थीच आहोत. मग या वेळेचा चांगला उपयोग करणं हे आपल्याच हाती आहे. नंतरच्या वयातही तुम्हाला हवे असलेले छंद-आवडी हे जोपासता येतात, नवी कौशल्यं शिकता येतात, पण तेव्हा तुमची बाहेरच्या जगात स्वत:च्या पायावर उभं राहण्याची धडपड सुरू असते. त्यावेळी हवी तेवढी एकाग्रता व वेळ आपण हाती घेतलेल्या इतर आवडीच्या कामासाठी देऊ शकत नाही. कदाचित त्यावेळी तुमच्यावर कुटुंबाची किंवा इतर काही जबाबदारी असू शकेल.

म्हणूनच आता कॉलेजच्या या सुट्टीचा एखादं छानसं कौशल्य शिकून घेण्यासाठी किंवा एखाद्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी वापर करा. मग आता उठा, मनासारखं लोळून झालं असेल, तर आता मेंदू व मनासाठीचा खुराक सुरू करा. त्यासाठी या सुट्टीत सर्वप्रथम एक काम करा, रोजची सर्व वर्तमानपत्रं नजरेखालून घाला. वृत्तपत्रात रोज महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी काही ना काही नवे उपक्रम येतच असतात. इंटरनेटवरची ग्रुप नोटिफिकेशन्स पाहा. मित्र-मैत्रिणींकडे ते या सुट्टीत काय करणार आहेत, त्यांचे काय प्लॅन्स आहेत याची चौकशी करा. याचा एक फायदा असा की, तुम्हालाही तुमच्या आवडत्या फ्रेण्ड्ससोबत एखादी ॲक्टिव्हिटी शिकता येईल. ग्रुपमधील मित्र-मैत्रिणींसोबत सुट्टीत एखादी गोष्ट करायची किंवा शिकायची म्हणजे धम्मालच. तुम्ही समजा फोटोग्राफी शिकणार असाल, तर फोटोग्राफी आवडणाऱ्या एखाद्या फ्रेण्डला तुमच्यासोबत घ्या व दोघांनी मिळून त्याचा आनंद घ्या.

फ्रेण्ड्ससोबत असण्याचा मोठा फायदा हा की तुम्ही एखादी गोष्ट शिकत असाल तेव्हा त्याचं मूल्यमापन एकमेकांना करता येईल. म्हणजे शिकताना एखादी गोष्ट समजली नसेल, चुकली असेल तर ती समजावून घेता येईल. शिवाय आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत काही वेगळं कौशल्य शिकण्याचा आनंद हा औरच असतो.

मात्र ते सोबत नसले तरीही तुम्ही तुमच्या आवडीच्या विषयामध्ये, छंदासाठी काय नवं शिकता येईल याचा शोध घ्या. एखादं अवगत असलेलं कौशल्य अजून विकसित करण्याचा प्रयत्न करा. उदाहरणार्थ तुम्हाला रॉक क्लायंबिंग येत असेल, तर प्रत्यक्ष ट्रेकिंगमध्ये त्याचा कसा उपयोग करता येईल हे शिकून घ्या. दोन-अडीच महिने हा मोठा काळ आहे. साधारणत: जूनमध्ये वगैरे कॉलेज सुरू होईल. एवढ्या कालावधीत तुमचा एखादा कोर्स नक्कीच होईल. अभिनय शिबिरात किंवा एखाद्या रॅपलिंग कॅम्पमध्ये तुम्हाला जाता येईल.

अशा कोणत्याही आवडत्या ॲक्टिव्हिटीमध्ये तुम्ही स्वत:ला गुंतवू शकता. हा काळ असतो बाहेरच्या जगात पाऊल टाकण्यापूर्वीचा. म्हणूनच व्यावसायिक जगात जाण्याआधी कॉलेजच्या या सुट्टीचा तुम्हाला उत्तम उपयोग करून घेता येईल. तुमच्या भावी करिअरच्या किंवा नोकरीच्या दृष्टीने त्याचा तुम्हाला फायदाच होईल. उदाहरणार्थ तुम्ही लघुपट निर्मिती क्षेत्रात पुढे जाणार असाल, तर या सुट्टीत एखादा शॉर्ट फिल्म मेकिंगचा कोर्स करा, प्रत्यक्ष एखाद्या लघुपटाच्या किंवा माहितीपटाच्या निर्मिती प्रक्रियेत सामील व्हा, निर्मिती प्रक्रियेचा एखादा वेगळा कोर्सही तुम्हाला करता येईल. अशा कोर्सेसचा तुम्हाला निश्चितच फायदा होईल.

समजा कॉलेजनंतर पुढे लगेच नोकरी करण्याचा विचार असेल, तर त्यादृष्टीने एखादं कौशल्य शिकून घ्या. तुमच्या अभ्यासक्रमाला भविष्यात महत्त्व व वजन मिळवून देणारे काही कोर्स तुम्ही करू शकता. उदाहरणार्थ तुम्ही भाषा क्षेत्रात करिअर करणार असाल, तर भाषेसंबंधी काही अतिरिक्त कोर्स तुम्हाला या सुट्टीत करता येतील. शिवाय एखादी भाषा तुम्हाला अवगत असेल तर ती शालेय विद्यार्थ्यांनाही तुम्ही घरच्या घरी शिकवू शकता.

# अपुऱ्या झोपेने हृदयरोगाचा धोका



अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या नव्या संशोधनानुसार, खूप जास्त किंवा खूप कमी झोपणे तसेच निद्रानाश आणि स्लीप ॲपनियासारख्या झोपेच्या विकारामुळे हृदयरोगाचा धोका अधिक असतो. पुरेशी झोप न घेतल्यास वजन, वय, दैनंदिन क्रियांची पातळी किंवा सवयींवर थेट परिमाण होतो. त्यामुळे हृदयरोग होण्याची शक्यता जास्त असते. झोप हा अनेक व्याधींवरील सर्वोत्तम, सावधगिरीचा उपाय आहे, हे संशोधकांनी पुन्हा एकदा जगाला सांगितले. मात्र तरीही चांगली झोप येणे आणि त्या संदर्भात आपले पुरेसे लक्ष नसते. आरोग्य आणि तंदुरुस्तीसाठी व्यायाम-आहाराकडे अवाजवी लक्ष `तो. अर्थात, ते चांगले आहे. शारीरिक तंदुरुस्तीसाठी योग्य जीवनशैलीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

त्यामध्ये पुरेशी, चांगली झोप अनिवार्यच आहे.शारीरिक-मानसिक ताण कमी करण्याचे झोप हे महत्त्वाचे साधन आहे. आपण अनेकदा झोपेकडे दुर्लक्ष करतातुमच्या हृदयाच्या आरोग्यावर झोपेचा थेट परिणाम होतो.झोपेमुळे शरीर-मनाच्या ऊर्जेची पुनर्प्राप्ती होत असल्याने हृदयावरील ताण कमी होतो.हे घडण्याचे कारण म्हणजे नॉनरॅपिड आय मूव्हमेंट अर्थात आपण स्वप्न पाहत नसतो ती स्थिती. झोपेत नंतदाब, हृदयाची गती कमी होते आणि श्वासोच्छ्वास स्थिर होतो. दुसरीकडे रॅपिड आय मूव्हमेंट म्हणजे तुम्हाला स्वप्ने पडतात आणि मेंदू तितकाच सक्रिय असतो ती स्थिती. म्हणजे दिवसभरात असतो तितका.

फरक एवढाच असतो की आपण शरीर हलवू शकत नाही.पुरेशी झोप न मिळाल्यास किंवा झोपेत व्यत्यय आल्यास तुमच्या हृदयाला नॉनरॅपिड आय मूव्हमेंटचा अजिबातच फायदा होत नाही. परिणामी उच्च नंतदाब, स्ट्रोक, उच्च कोलेस्टेरॉल आणि मधुमेहाची शक्यता वाढते. अपुऱ्या झोपेमुळे दीर्घकालीन ताणतणाव, अतिरेकी खाणे, आळशीपणा, मानसिक विकारांमध्ये वाढ होते. याच्या एकत्रित परिणामातून हृदयविकाराचा धोका वाढतो.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भिवापुरी मिरची जाणार इटलीत; ई-कॉमर्स माध्यमातून महिला बचतगटांची भरारी

**नागपूर :** जिल्ह्यातील भिवापुरी मिरचीला देशभरात मागणी असते. अलीकडेच या मिरचीला जीआय टॅगही मिळाला आहे. आता ही मिरची देशाबाहेर जाण्यास सज्ज झाली आहे. राज्य सरकारने ई-कॉमर्सच्या माध्यमातून काही कंपन्या व महिला बचतगटांसोबत सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. यामार्फत आता जिल्ह्यातील बचतगटांची विविध उत्पादने सातासमुद्रापार जाणार आहेत. यात प्रामुख्याने भिवापुरी मिरचीचा समावेश असून तिला इटली, बांग्लादेश, दुबई यांसारख्या देशात चांगली बाजारपेठ मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहेजिल्हा परिषदेच्या अर्थात उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत स्थापन महिला स्वयंसहायता सम्हाने उद्योगाची कास धरली आहे. स्वतःचे स्टार्टअप तयार करीत राज्यातच नव्हे तर ई-कॉमर्स कंपन्यांच्या माध्यमातून सातासमुद्रापार उत्पादन पोहोचविले



आहे. यावर्षीची अंदाजे एकूण उलाढाल ही साडेचार कोटी रुपयांवर पोहोचली आहे.याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी म्हणाले, ई-कॉमर्स प्रणालीद्वारेही या उत्पादनांची विक्री सुरू आहे. ३५ बचतगट कंपन्या या माध्यमातून आपला व्यवसाय करतात. उमेद मार्ट या स्वतःच्या प्लॅटफॉर्मसोबत ॲमेझॉन, इंडिया मार्ट आणि मेशोसारख्या ई-कॉमर्स प्लॅटफार्मवरही ते विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

याबाबत अधिक माहिती देताना जिल्हा व्यवस्थापक (विपणन) अमोल बाविस्कर म्हणाले, जिल्ह्यात तयार होणाऱ्या काही कलाकुसरीच्या वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळणार आहे. यासाठी राज्य सरकारने सामंजस्य करार केला आहे. यात बचतगटांना सुरुवातीला नोंदणीसाठीची प्रक्रिया स्वःखर्चावर करावयाची आहे. त्यानंतर त्यांच्या उत्पादनांना काही कंपन्यांद्वारे आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळेल. यात भिवापुरी मिरचीला इटली, बांग्लादेश, दुबई यांसारख्या देशात चांगली बाजारपेठ मिळण्याची आशा आहे. तसेच जिल्ह्यात तयार होणारी म्युरल्स, लाकडी खेळणी काही पेंटिंग्स यांनाही आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळणार आहे.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो पुढील वर्षी; सप्टेंबरअखेर होणार चाचणी

**पुणे :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचे काम सप्टेंबर २०२५ च्या मुदतीत नाही, तर त्यानंतर सहा महिन्यांनी म्हणजे पुढील वर्षी (२०२६) मार्चमध्ये पूर्ण होणार आहे. त्यामुळे या मार्गावरून दररोज ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना, तसेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील (आयटी) कर्मचाऱ्यांना आणखी ११ महिने वाहतूक कोंडीतूनच मार्ग काढावा लागणार आहे. येत्या सप्टेंबर महिन्यापर्यंत मेट्रोची चाचणी सुरू करण्याचे संकेत प्राधिकरणाने दिले असले, तरी प्रवासी सेवा सुरू होण्यास मात्र प्रतीक्षाच करावी लागणार आहे.प्राधिकरणाकडून हाती घेण्यात आलेल्या माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाचे ८५ टक्क्यांपेक्षा जास्त काम पूर्ण झाले आहे. २३.३ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिकेसाठीच्या पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून बहुतांश ठिकाणी रूळ टाकण्यात आले आहेत, अशी माहिती पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी दिली. सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) अंतर्गत विकसित होत आहे. भूसंपादन, परवानग्यांमुळे विलंब झाला.क्वाड्रन, इन्फोसिस फेज दोन, डोहलर, विप्रो, पल इंडिया, शिवाजी चौक, हिंजवडी, वाकड चौक, बालेवाडी स्टेडियम, एनआयसीएमएआर, रामनगर, लक्ष्मीनगर, बालेवाडी फाटा, बाणेर गाव, बाणेर, भारतीय कृषी संशोधन संस्था, सकाळनगर , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर आणि दिवाणी न्यायालय अशी २३ स्थानके आहेत. यापैकी ११ स्थानकांवर सरकते जिने आहेत . तसेच प्रतीक्षालय, आसन क्षमता, व्यापारी संकुल, ठरावीक वाहनांसाठी सुविधा आदी नियोजन करण्यात आले आहे.हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रोप्रकल्पाच्या स्थानकांवरील सुविधांचे कामे अंतिम टप्प्यात आहे. सप्टेंबर महिन्यापर्यंत चाचणी घेऊन त्रुटी, अडथळे दूर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# चपाती होईल कापसासारखी मऊ व लुसलुशीत, फक्त पीठ मळताना चिमुटभर घाला हा सीक्रेट पदार्थ...

भारतीय जेवणात पोळी किंवा चपाती ही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. मात्र अनेकदा घरात पोळ्या बनवताना त्या खरडसर होतात, नीट फुलत नाहीत किंवा पटकन कडक होतात. यामुळे जेवणाची चव आणि मजा दोन्ही कमी होते. विशेषतः मुलं, वृद्ध आणि पाहुणे असतील तर मऊ, फुलक्या पोळ्यांचीच अपेक्षा असते. अनेक घरांमध्ये पोळ्यांसाठी पीठ मळणं, लाटणं आणि भाजणं हे रोजचं काम असलं तरी योग्य तंत्र वापरलं नाही तर परिणाम समाधानकारक येत नाही.पोळी मऊ व्हावी यासाठी केवळ साहित्य नाही तर त्याची वेळ, प्रमाण आणि प्रक्रिया ही देखील महत्त्वाची आहे. खाली दिलेले टिप्स वापरल्यास तुम्हालाही अगदी सहज मऊसूत, फुलक्या आणि स्वादिष्ट पोळ्या करता येतील.पोळ्यांचं पीठ मळताना थंड पाण्याऐवजी कोमट पाणी वापरावं. कोमट पाणी पीठात मऊपणा आणतं आणि पोळ्या लवकर सुकत नाहीत. पाणी हळूहळू घालून पीठ चांगलं मळा आणि शेवटी एक चमचा तेल घालून पुन्हा मळा.

**पीठ मळून किमान अर्धा तास झाकून ठेवा**

पीठ मळल्यानंतर ते थोडा वेळ झाकून ठेवणं अत्यावश्यक आहे. यामुळे त्यातील घटक एकसंध होतात, पीठ सेट होतं आणि चपाती लाटताना फाटत नाही. हे एक पाऊल मऊ चपात्यांसाठी फारच महत्त्वाचं आहे.

लाटताना फार जोर लावू नका, मध्यम जाडी ठेवा

पोळी लाटताना खूप पातळ किंवा खूप जाड न लाटता मध्यम जाडीची ठेवावी. लाटताना एकसंध दाब द्या आणि एका बाजूला ओढत न लाटता गोलाकार फिरवत लाटा. यामुळे चपाती नीट फुलते आणि मऊ राहते.

**तवा मध्यम तापमानावर असावा**

तवा खूप गरम किंवा थंड न ठेवता मध्यम आचेवर तापवलेला असावा. एकदा तवा व्यवस्थित तापला की पोळी भाजायला ठेवा. पहिली बाजू थोडीशी भाजली की उलटवा आणि दुसऱ्या बाजूवर थोडं दाब देऊन पोळी फुलवा. अति भाजू नये.

भाजल्यावर पोळ्या लगेच झाकणाखाली ठेवाव्यात

पोळी भाजल्यानंतर लगेच ताटात न ठेवता स्वच्छ कापड किंवा झाकणाखाली ठेवाव्यात. यामुळे पोळ्या मऊ राहतात,



वाफेने त्या अजून नरम होतात आणि गरमही टिकतात. गरज असेल तर त्यावर थोडं तूप लावावं.

**पीठ मळताना वापरा हे पदार्थ**

चपातीचे पीठ मळताना त्यात चिमुटभर मीठ आणि साखर घाला. मीठ पिठातील अतिरिक्त पाणी शोषून घेते ज्यामुळे चपाती जास्त वेळ मऊ टिकून राहते. साखर पिठाला मऊ आणि लुसलशीत बनवते. कारण साखर प्रथिने आणि स्टार्चला एकत्र बांधून ठेवण्यास मदत करते ज्यामुळे पीठ लवकर एकसंध होते आणि चपाती मऊसूत लाटली जाते. पण पिठात जास्त साखर वापरल्यास ती चिकट आणि गोड होईल म्हणून मीठ व साखर अगदी नेमक्या प्रमाणातच घाला.

मऊ आणि स्वादिष्ट पोळ्या बनवायच्या असतील, तर वर दिलेल्या टिप्स नक्की वापरून पहा. या छोट्या-छोट्या गोष्टींचं पालन केल्यास रोजच्या जेवणात पोळी ही खास चविष्ट बनते. पोळीच्या योग्य तंत्रामुळे संपूर्ण जेवणाची मजा वाढते आणि आरोग्यही टिकून राहतं.

# गर्भाशयाच्या कर्करोगाचं थैमान



गर्भाशयाचा कर्करोग जगभरातच वाढत चालला असून, भारतही याला अपवाद नाही. जगभरातले एक पंचमांश रुग्ण भारतात आहेत. किशोरवयीन मुलींमध्ये या आजाराचं प्रमाण वाढत आहे. व्याधीचे वाढते प्रमाण आणि तिच्या प्रतिरोधाबाबत जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशींनुसार घेतलेला आढावा.

गर्भाशयाच्या कर्करोगाची वाढती समस्या, ही जगभरची गंभीर समस्या बनत चालली आहे. कारण, पूर्वी तीस वर्षापुढील वयोगटात ही समस्या आढळून येत असे. आता मात्र विशीतच हा कर्करोग आढळत आहे. गर्भाशयाच्या किंवा गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचं प्रमाण भारतातही वाढत आहे. जगातल्या या आजाराच्या रुग्णांपैकी एक पंचमांश रुग्ण भारतात आढळतात, एवढी ही चिंता वाटण्याजोगी बाब आहे. २०१५ मध्ये जगातल्या ३८ लाख महिलांना हा कर्करोग झाला होता आणि ९० हजार महिलांचा मृत्यू झाला होता. भारतात दर वर्षी सुमारे १ लाख ३० हजार नवीन रुग्ण आढळत आहेत. २०१५ पर्यंत गर्भाशयाचा कर्करोग झालेल्या महिलांची भारतातली संख्या सुमारे २,२६,००० असेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. आजार जीवघेणा असल्यामुळे याविषयीची भीतीही महिलांमध्ये पसरल्याचं आढळतं. मात्र, तरीही यासाठीची पॅपस्मिअर चाचणी वेळेवर करून घेतली जात नाही. त्यामुळे महिलांची मृत्यूची संख्या वाढत चालली आहे. २००२ मध्ये गर्भाशयाच्या कर्करोगानं ७४,११८ महिलांचा मृत्यू झाला होता, तर अलीकडे हा आकडा २ लाख ७० हजापर्यंत पोहोचला आहे. कर्करोगामुळे मुळातच मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असले तरी भारतात मरण पावणा-या एकूण कर्करुग्णांपैकी १० टक्के रुग्णांचा गर्भाशयाच्या कर्करोगामुळे मृत्यू होतो. भारतात स्तनाच्या कर्करोगाच्या खालोखाल महिलांमध्ये गर्भाशयाचा कर्करोग आढळतो. मात्र, याविषयी महिलांमध्ये पुरेशा प्रमाणात जागृती झालेली नाही.

हा गर्भाशयाच्या मुखाला आणि सर्वात खालच्या भागाला होणारा घातक आजार आहे. या कर्करोगात गर्भाशयातल्या पेशी अनियंत्रितपणे वाढू लागतात. गर्भाशयाच्या कोणत्याही पेशीची अनियमित वाढ होणं, हे या कर्करोगाचं प्राथमिक लक्षण आहे. यामुळे गाठ तयार होऊ शकते. यातून मासिक पाळी अनियमित होते किंवा लैंगिक संबंधांनंतर अगर रजोनिवृत्तीनंतर सातत्यानं योनीमार्गातून रक्तस्रव सुरू होतो. योनीमार्गातून इतर किंवा पांढरा स्रव बाहेर पडणं हे ही याचं एक लक्षण आहे. लघवी करताना त्रास होणं किंवा अडथळे आल्यासारखं वाटणं, अशी याची लक्षणं आहेत. ती दिसल्यास तातडीने ही चाचणी करावी लागते. अनेकदा या कर्करोगाला मानेच्या मणक्याचा कर्करोग समजला जाण्याची शक्यताही असते.

या कर्करोगाचे चार टप्पे असतात आणि ते बायोप्सी, छातीचा एक्स-रे आणि किंवा सीटी अगर एमआरआय स्कॅनद्वारे निश्चित केले जातात. पहिल्या टप्प्यात हा कर्करोग गर्भाशयाच्या बाहेरच्या आवरणात किंवा मधल्या आवरणात निम्म्यापर्यंत पोहोचलेला असतो. दुस-या टप्प्यात तो गर्भाशयाच्या सर्व्हिक्स या भागापर्यंत पोहोचतो, पण गर्भाशयाबाहेर पसरलेला नसतो. तिस-या टप्प्यात तो गर्भाशयाबाहेर पसरलेला असतो, पण ओटीपोटाच्या पलीकडे पोहोचलेला नसतो. चौथ्या टप्प्यात तो ओटीपोटाच्याही पलीकडे पसरतो. या कर्करोगाच्या निदानासाठी पॅपस्मिअर ही चाचणी करावी लागते. कर्करोग सुरुवातीच्या टप्प्यात असतानाच निदान झालं, तर महिला बरी होऊ शकते. मात्र, आजार तिस-या किंवा चौथ्या टप्प्यात पोहोचला की, बहुतेक महिलांच्या कर्करोगाचं निदान होतं आणि त्या वाचणं कठीण बनतं.

सहसा हा कर्करोग ३० ते ४५ या वयोगटात म्हणजेच लैंगिकदृष्ट्या सक्रिय असलेल्या महिलांमध्ये आढळतो.

१२ वर्षाच्या आधीच पाळी सुरू होणं, ५५ वर्षानंतर मेनोपॉज येणं, इस्ट्रोजेन उपचार करून घेणं, टाईप २ मधुमेह असणं, धूम्रपान, तंबाखूचा वापर, खालावलेला सामाजिक आर्थिक स्तर आणि अँटिऑक्सिडंट्सचं प्रमाण कमी असलेला आहार अशीही यामागची कारणं सांगितली जातात. शिवाय कमी वयात लैंगिक संबंध राखले जाणं, लठ्ठपणा, हार्मोनल गर्भनिरोधकांचा दीर्घ काळ वापर, गर्भधारणेचं जास्त प्रमाण आणि अस्वच्छता ही या कर्करोगाची काही प्रमुख कारणं आहेत. तसंच मुलं जन्माला न घालणा-या महिलांनाही हा कर्करोग होत असल्याचं आढळलं आहे. याखेरीज गर्भाशयाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास असणं, हे ही एक महत्त्वाचं कारण आहे.

ह्युमन पॅपिलोमा व्हायरस म्हणजे एचपीव्ही विषाणूंचा संसर्ग झाल्यानंतर सुमारे वीस वर्षापर्यंत हा विषाणू सुप्तावस्थेत राहतो. त्यामुळे कर्करोग संसर्गानंतर २० वर्षांनंतर उद्भवू शकतो. हा विषाणू लैंगिक संबंधांच्या वेळी एका व्यक्तीकडून दुसरीकडे संक्रमित होऊ शकतो. योग्य वेळी निदान झालं, तर या संसर्गातून सुमारे ९९ टक्के महिला मुक्त होऊ शकतात. पॅपस्मिअर चाचणी करून घेण्याविषयी बहुतेक महिलांना माहिती नसते. एकदा ही चाचणी करून घेतल्यानंतर दरवर्षी करावी लागत नाही. त्यानंतर दर तीन वर्षांनी किंवा अगदी पाच वर्षांनीही ती केली तरी संसर्ग झाला असल्यास समजू शकतं. पॅपस्मिअरबरोबर एचपीव्ही डीएनए चाचणीही उपयुक्त ठरते. पेल्व्हिक चाचण्या, अल्ट्रासाऊंड, बायोप्सी आदी चाचण्याही केल्या जातात. निदानाची खात्री करून घेण्यासाठी सीटी किंवा एमआरआय चाचण्या घेतल्या जातात.

लैंगिक संबंध राखताना वेदना होणं, पायांमध्ये किंवा योनीभागात वेदना होणं, थकवा येणं, वजन कमी होणं, भूक कमी होणं, एका पायाला सूज येणं ही या कर्करोगाची काही लक्षणं आहेत. शस्त्रक्रिया, रेडिएशन, हार्मोन उपचारपद्धती आणि केमोथेरपी असे यावरचे उपचार आहेत. केमोथेरपीद्वारे कर्करोगाच्या पेशी नष्ट केल्या जातात. केमोथेरपीची मालिका असते आणि दोन केमोथेरपी चक्रांदरम्यान विश्रांतीची गरज असते. एकदा उपचार घेतल्यानंतरही काही काळानं हा कर्करोग पुन्हा होऊ शकत असल्यानं उपचार पूर्ण झाल्यावरही ठरावीक कालांतरानं डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पुन्हा तपासण्या करून घेत राहणं आवश्यक असतं.


एचपीव्ही लसीकरण महत्त्वाचं २००६ पासून एचपीव्ही प्रतिरोधक लसी सर्वत्र उपलब्ध झाल्या असून, विषाणूच्या किमान नऊ प्रजातींपासून संरक्षण करतात. एचपीव्ही १६ आणि १८ या प्रजाती गर्भाशयाच्या कर्करोगाला प्रामुख्यानं कारणीभूत असतात आणि या लसींमुळे या विषाणूंना प्रतिबंध होतो. तसंच सुमारे ८० टक्के गुदाशयाचे कर्करोग आणि ६० टक्के योनीमार्गाचे कर्करोगही या लसींमुळे प्रतिबंधित होतात. या लसींमुळे तोंडाच्या कर्करोगांनाही आळा बसतो, असं संशोधनांमधून स्पष्ट झालं आहे.

# चुकीचे उच्चार दुरुस्त करणारी इलेक्ट्रॉनिक टाळू

उचलली जीभ, लावली टाळ्याला अशी एक म्हण आहे. हीच टाळू बोलताना शब्दांचे उच्चार करण्यासाठी उपयुत आहे. पण काही लोक अडखळत बोलतात किंवा नीट उच्चार करीत नाहीत. त्यांच्यासाठी आता लवकरच इलेट्रॉनिक टाळू उपलब्ध होणार आहे.

ही टाळू तुमच्या शब्दाचा उच्चार कोठे चुकीचा होत आहे हे दाखवेल. शब्दाचा उच्चार करताना बोलण्याचा वेग महत्त्वाचा असतो. कोणत्या ध्वनीसाठी जीभेचा तोंडाच्या कोणत्या भागाला स्पर्श झाला पाहिजे हे फार महत्वाचे असते. आता भारतात उच्चार विज्ञान खूपच विकसित झाले आहे. देवनागरी मुळाक्षरे उच्चारामुळे मुलांचा विकास होतो.

तरीही शब्दाचा उच्चार करताना कधी कधी चूक होतेच. ही चूक दुरुस्त करण्यासाठी इलेट्रोपॅलेटोग्राफचा (इलेट्रॉनिक टाळू) शोध लागला आहे. सध्या या इलेट्रॉनिक टाळूची किंमत सामान्य लोकांना परवडणारी नाही.व्यावसायिक पातळीवर उत्पादन होऊ लागताच ही इलेट्रॉनिक टाळू स्वस्त किमतीत उपलब्ध होणार आहे. तुम्ही बोलणे सुरू करता त्या वेळी जीभ सवयीनुसार टाळूला वेगवेगळ्या ठिकाणी स्पर्श करते व जिभेचा इलेट्रॉनिक टाळूला स्पर्श झाल्यास हलका करंट लागतो व कॉम्प्युटरमध्ये फिड होतो. ही प्रक्रिया कॉम्प्युटरवरसुद्धा पाहता येईल.



# ट्रेंड वैयक्तिक उत्पादनांचा!



सर्वांसाठी एकाच प्रकारचं सौंदर्यप्रसाधन विकण्यापेक्षा प्रत्येक ग्राहकाच्या गरजेनुसार त्याच्या त्वचेला लागू पडेल, अशा प्रकारचं वैयक्तिक सौंदर्यप्रसाधन तयार करण्याचा ट्रेंड बाजारपेठेत रुजतोय. अनेक स्टार्ट-अप कंपन्या ही नवी संकल्पना घेऊन बाजारपेठेत येत आहेत. या ट्रेंडचं उज्ज्वल भवितव्य लक्षात आल्यामुळे आजच्या आघाडीच्या कंपन्यांनीही अशा कंपन्यांमध्ये गुंतवणूक करण्यास सुरुवात केली आहे. या नव्या ट्रेंडविषयी..

मार्केटिंगच्या क्षेत्रात कायम बदल होत असतात आणि आपली उत्पादनं खपवण्यासाठी कंपन्या नवनवीन क्लृप्त्या लढवत असतात. सध्याचं युग हे पर्सन्लायझेशनचं आहे. अगदी समाजमाध्यमांवर दिसणा-या जाहिरातीही आपल्या आवडी-निवडी लक्षात घेऊन दाखवल्या जातात. त्यामुळे प्रत्येकाला दिसणा-या जाहिराती वेगळ्या असतात. पण, आता चक्क उत्पादनांमध्येही पर्सन्लायझेशन येऊ घातलं आहे. म्हणजे पूर्वी फक्त पानवाला किंवा पाणीपुरीवाला प्रत्येक ग्राहकाला हवं तसं पान किंवा पाणीपुरी तयार करून देत असे. आता चक्क ग्राहक स्वत:ला हवी तशी सौंदर्यप्रसाधनंही कंपन्यांकडून तयार करून घेऊ शकतो! तंत्रज्ञानाच्या बळावर हे शक्य झालं आहे. काही स्टार्ट-अप कंपन्यांनी केवळ जाहिराती करून आपली उत्पादनं विकण्यापेक्षा ग्राहकांच्या अधिक जवळ जाण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. स्किन क्राफ्ट, फ्री विल, बेअर ॲनाटॉमी आणि वेदिक्स अशा काही कंपन्यांनी पाश्चिमात्य देशांमध्ये लोकप्रिय झालेला असा ट्रेंड देशात आणला आहे. याला डायरेक्ट टू कन्झ्युमर अथवा डीटीसी असं म्हटलं जातं.

बोस्टन कन्सिल्टग ग्रुपने केलेल्या एका सर्वेक्षणामध्ये शहरी ग्राहकांपैकी ५६ टक्के ग्राहकांनी अशा प्रकारच्या पर्सन्लाईज्ड सौंदर्यप्रसाधनांना पसंती दर्शवली आहे. त्यांनी अशा उत्पादनांसाठी अधिक पैसे मोजण्याचीही तयारी दाखवली आहे. टेन ट्रेंड्स दॅट आर अल्टिरग कन्झ्युमर बिहेवियर इन इंडिया अर्थात देशातल्या ग्राहकांची मानसिकता बदलणारे दहा ट्रेंड्स हा सर्वेक्षणाचा विषय होता. यातून आणखीही काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यात महत्त्वाचं म्हणजे, ५० टक्के ग्राहकांना आंतरराष्ट्रीय ब्रँड्सपेक्षा देशी ब्रँड्सची सौंदर्यप्रसाधनं घेण्यात अधिक रस दिसून आला. सौंदर्यप्रसाधनांची बाजरपेठ पूर्णत: मार्केटिंगच्या अर्थात जाहिरातींच्या आधारे चालते. अशा बाजारपेठेत ग्राहकांशी संवाद साधून आपल्याबद्दल आत्मीयता निर्माण करून स्वत:चं वेगळं स्थान तयार करण्यासाठी या कंपन्या डेटा सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स या तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत.

या कंपन्या ग्राहकांना एक ऑनलाईन प्रश्नावली भरायला सांगतात. त्यातून ग्राहकांच्या गरजा आणि अपेक्षा जाणून घेतल्या जातात. प्रत्येक ग्राहकासाठी वेगळं सौंदर्यप्रसाधन तयार करण्यासाठी त्या ग्राहकाचं राहण्याचं ठिकाण, तिथलं वातावरण, ग्राहकाची जीवनशैली, त्यांची रंग आणि सुगंधांची आवड याची माहिती घेऊन एका सॉफ्टवेअरमध्ये टाकली जाते. सॉफ्टवेअरमधून त्या ग्राहकासाठी आपोआप योग्य फाम्र्युला तयार होतो. त्या फॉम्र्युल्यानुसार ते खास उत्पादन तयार केलं जातं. काही कंपन्या त्या उत्पादनाच्या पॅकिंगवर ग्राहकाचं नाव टाकून देण्याची सुविधाही पुरवतात. आपल्या नावाने तयार झालेलं उत्पादन वापरून ग्राहकाला त्या कंपनीबद्दल आत्मीयता (सेन्स ऑफ बिलाँगिंगनेस) वाटायला लागते.

फ्री विल या कंपनीचे सहसंस्थापक मोहित यादव यांना गेल्या अनेक वर्षांमध्ये सौंदर्यप्रसाधनांच्या बाजारपेठेत फारसे बदल झाल्याचे दिसत नव्हते. अगदी शॅम्पूची सुरुवात झाल्यापासून उत्पादनांमध्ये फारसं नावीन्य पाहायला मिळत नव्हतं. कोणत्याही कंपनीमध्ये एखाद्या उत्पादनाच्या मुख्य घटकाबद्दल एखादी मार्केटिंग स्टोरी तयार केली जाते आणि मग त्यानुसार ते उत्पादन तयार केलं जातं. उदा. कोलगेटने आपल्या टूथपेस्टमध्ये मीठ किंवा कोळसा असल्याची जाहिरात केली. या जाहिरातीची संकल्पना आधी तयार झाली आणि मग ती टूथपेस्ट तयार झाली. या संकल्पना दर सहा महिन्यांनी बदलत असतात.

जगात सौंदर्यप्रसाधनांची बाजारपेठ ५३२ अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढी मोठी आहे. त्या मानाने भारतातली ही बाजारपेठ पाच टक्क्यांहूनही कमी आहे. अर्थात देशाच्या बाजारपेठेत आता नायका, शुगर कॉस्मॅटिक्स, माय ग्लॅम, बॉम्बे शेव्हिंग कंपनी, द मॅन कंपनी अशा अनेक स्टार्ट अप कंपन्यांनी प्रवेश केला आहे. केवळ प्रवेशच केलेला नाही, तर बाजारपेठेत आपलं नाव गाजवायलाही सुरुवात केली आहे. या कंपन्यांनी जुन्या आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी नावं असलेल्या लॉरियल, युनिलिव्हर, प्रॉक्टर अँड गॅंबल तसंच विप्रो, गोदरेज, मेरिको, डाबर आणि इमामी या भारतीय कंपन्यांसमोर मोठी आव्हानं उभी करायला सुरुवात केली आहे. या कंपन्यांचा विस्तार वेगाने होत आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या उत्पादनांच्या श्रेणीतही वाढ केली आहे.

काही मोठया कंपन्यांनी या नवीन तंत्रज्ञानाचं भवितव्य ओळखून गुंतवणूक करायचं ठरवलं आहे. मेरिकोने नायका या कंपनीत गुंतवणूक करून त्यांचे काही समभाग घेतले आहेत, तर कोलगेट पामोलिव्हने बॉंबे शेव्हिंग कंपनीमध्ये गुंतवणूक केली आहे. इमामीने द मॅन कंपनीमध्ये तर युनिलिव्हरने प्लमम या कंपनीत गुंतवणूक केली आहे. व्हेंचर कॅपिटल कंपन्या म्हणजेच व्यावसायिक तत्त्वावर गुंतवणूक करणा-या कंपन्यांनीही या क्षेत्रावर लक्ष केंद्रित केलं आहे. या कंपन्यांच्या मते, कस्टमायझेशन केवळ लक्झरी ब्रँड्स आता सर्वसामान्य ग्राहकांसाठीही हे होऊ लागलं आहे. आता या क्षेत्रात अनेक नव्या कंपन्या प्रवेश करत असल्या तरी योजनेची अंमलबजावणी कशा प्रकारे करतात, यावर त्यांचं भवितव्य अवलंबून आहे.

प्रत्येक ग्राहकासाठी वेगळं उत्पादन तयार करून आपलं वचन निभावण्यात त्यांचा खरा कस लागेल. अर्थात आजची तरुण पिढी या कंपन्यांसाठी योग्य ग्राहक आहे. या पिढीला स्वत:साठी बाजारात वेगळं काही तरी तयार होत असल्याचं विशेष समाधान असतं. कंपन्यांनाही याद्वारे त्यांच्याशी चांगले बंध निर्माण करण्याची संधी मिळते. त्यात या कंपन्यांनी नैसर्गिक, रसायनविरहित आणि ऑरगॅनिक उत्पादनं दिली, तर ते ग्राहकांना हवंच आहे. फक्त लाखो ग्राहकांसाठी अशी युनिक उत्पादनं तयार करताना कंपनी स्वत:ची आयडेंटिटी विसरणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल.

# वास्तव गावाकडच्या आईचं..

गावाकडच्या ब-याचशा बायकांना आज सुनाच मिळत नाहीत. पोटची मुलं तिशी-पस्तिशी ओलांडायला आली तरी बायकोच मिळवू शकत नाहीत. बरं, हवी तशीच नाही तर, विधवा, परित्यक्ता सूनही मिळवणं गावपातळीवर अवघड बनू लागलं आहे. जातीबाहेरचीच काय पण पैसे देऊनही सुना मिळत नाहीत, हे वास्तव ठरू लागलंय. वीस वर्षांपूर्वी अहमहमिकेने घडवलेले मुलींचे गर्भपात आता मोठा सामाजिक भस्मासूर म्हणून समोर उभे ठाकले आहेत..

गावाकडचं वास्तव शब्दात मांडायचं झाल्यास सुरुवात आजपासून किंवा ङ्गआईफ्पासून करावी लागेल! म्हणून आजच्या आईपासून कानोसा घ्यायचं म्हटल्यास गावाकडची आजची आई भलतीच थकलीय, हे वास्तव समजून घ्यायची गरज आहे. होय, गावाकडच्या सगळ्याच आया पुरत्या थकल्याहेत. खरं तर हे त्यांचं थकण्याचं वय नाही आणि त्याही थकल्याच नसत्या; जर नेहमीप्रमाणे या वयात त्यांच्या हाताखाली सुना आल्या असत्या. कारण, कसंही झालं तरी पन्नाशी लागण्यापूर्वीच चाळीस-पंचेचाळीशीत घरात सून यायची. ती आली म्हणजे बरीच कामं, जबाबदा-या सांभाळू लागायची. म्हणजे लग्न लागलं तसं मानगुटीवर लादलेलं संसाराचं ओझं ती आल्यानंतर हमखास हलकं व्हायचं. किमान घर तिच्या भरवशावर टाकून काही काळ मोकळं होता यायचं. किमान स्वयंपाक, धुणीभांडी, घरातलं, शेतातलं बरंचसं काम तिच्यामुळे मार्गी लागायचं. जीवावरचा, देहावरचा बराचसा भार बिनदिक्कत तिचा व्हायचा. परंपरा म्हणून किंवा प्रेम म्हणून.. अलीकडे मात्र मुलं चाळिशीला येऊ घातली, पण सुना नशिबी येईनात. म्हणून घरातलं, दारातलं, शेतातलं सगळं पन्नाशीकडे सरकणा-या बिचा-या आयांनाच निस्तारावं लागतंय. त्यामुळे त्यांची कमालीची दमछाक होतेय. पण बिचा-या करणार तरी काय? गावाकडच्या ब-याचशा बायकांना सुनाच मिळत नाहीत. पोटची मुलं तिशी-पस्तिशी ओलांडायला आली तरी बायकोच मिळवू शकत नाहीत. बरं, हवी तशीच नाही तर, कशीही असली तरी तयारी आहे. बिनलग्नाची नाही तर विवाहित, विधवा, परित्यक्ता अशी कुणीही चालू शकते. जातीबाहेरचीच काय पण पैसे देऊनही सुना मिळत नाहीत, हे वास्तव ठरू लागलंय. नोकरीशिवाय घरी राहून गेलेली किती तरी मुलं घरोघरी आहेत. तरी बरं, कोणी शेती करतो, कुणी मोलमजुरी करतो, कोणी धंदा-व्यवसाय करतोय. काही आहेतही रिकामे, नालायक; पण येनकेनप्रकारेन चांगल्यापैकी रोजीरोटीला लागलेल्या आणि शिकून-सवरूनही फक्त नोकरी न लागल्याने इतर कामं करणा-या हजारो मुलांना सध्या बायको म्हणून मुलीच मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्या आयुष्याचं काय मातेरं होत असेल हा प्रश्न वेगळा! तूर्तास मात्र बिचा-या आईची स्थिती अवघड झालीय. एकतर दिवसागणिक वय लोटलं जाताना नाना यत्न-प्रयत्न करूनही लग्न होत नसल्याने वैफल्यग्रस्त होत जाणा-या पोटच्या लेकराचं दु:ख सहन होत नाहीच. पण दुसरीकडे घरादारातला रोजचा कामधंदा आवरण्यासाठीही कुणी मदतीला नसल्याने या सर्व आयांच्या हालअपेष्टांचं प्रमाणही वाढत्या वयासोबत वाढत चाललं आहे. जात कोणतीही असो, कुटुंबाचा धंदा, व्यवसाय कोणताही असो, परिस्थिती गरिबीची असो वा श्रीमंतीची; कुठलाच भेदाभेद न करता हे वास्तव गावाकडच्या जवळपास सगळ्याच आयांना सरसकट लागू पडतंय

# इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह प्रवेश अर्जाची १७ ऑगस्ट अंतिम मुदत

**जनसंचलन/ संग्रामपूर**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना यांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्या पत्रानुसार १२ वी नंतरच्या बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय वसतिगृहामध्ये अर्ज करणे अनिवार्य आहे. अर्ज :// .. या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख १७ ऑगस्ट २०२५ आहे. बी.ए., बी.कॉम., बी.एस.सी. तसेच एम.ए., एम.एस.सी. अशा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज करता येईल. अर्जांची छाननी १८ ते २१ ऑगस्ट दरम्यान होईल. गुणवत्तेनुसार पहिली निवड यादी २२ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. या यादीतील पात्र विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची अंतिम मुदत ४ सप्टेंबर आहे. त्यानंतर उर्वरित रिक्त जागांवर दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांची निवड करून यादी ५ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होईल. या दुसऱ्या यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश घेण्याची अंतिम मुदत २५ सप्टेंबर २०२५ ठेवण्यात आली आहे. ही सर्व प्रक्रिया शासन निर्णयामधील अटी व शर्तींच्या अधीन राहून राबविण्यात येणार आहे. या योजनेसाठी अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी इतर मागास बहुजन कल्याण सहाय्यक संचालक मनोज मेरत यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बुलढाण्याचा राष्ट्रीय सन्मान !

## स्वातंत्र्य दिनासाठी बोथा येथील वनीता बोराडे यांना राष्ट्रपती भवनाकडून विशेष आमंत्रण

**जनसंचलन/बुलढाणा**

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली येथे आयोजित ॲट होम रिसेप्शन या समारंभासाठी बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील बोथा येथील सोयरे वनचरे फाउंडेशनच्या वनीता जगदेव बोराडे यांना विशेष आमंत्रण पाठविण्यात आले आहे. हे आमंत्रणपत्र असलेली पार्सल पिशवी वनीता बोराडे यांच्या पत्त्यावर पाठविण्यात आली असून, ही बाब बुलढाणा जिल्ह्यासाठी गौरवाची आहे. पार्सल वितरणाची कार्यवाही डाक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. वितरणाच्या माहितीसाठी मेहकर उपविभागीय डाक निरीक्षक जी. बी. काळे, डाकघर सहायक अधीक्षक कै. का. तायडे यांना संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शाळकरी मुली व दिव्यांग महिलांसाठी अनुदान योजना !

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने ग्रामीण भागातील अनुसूचित जाती प्रवर्गातील शाळकरी मुलींसाठी आणि दिव्यांग महिलांसाठी लेडीज सायकल आणि पिठाची चक्की खरेदीसाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेनुसार सन २०२४-२५ अंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील ७ वी ते १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलींना लेडीज सायकल खरेदीसाठी थेट लाभ हस्तांतरण (डिबीटी) पद्धतीने अनुदान देण्यात येणार आहे. तसेच सन २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत दिव्यांग महिला आणि मुलींना पिठाची चक्की खरेदीसाठी अनुदान देण्याची तरतूद आहे. या दोन्ही योजनांसाठी पात्र महिला लाभार्थींनी आपल्या तालुक्याच्या एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयातून विहीत नमुन्यात अर्ज प्राप्त करून, आवश्यक कागदपत्रांसह तो पूर्ण भरून सादर करणे अपेक्षित आहे. अर्जाचे नमुने व अटी-शर्ती संबंधित प्रकल्प कार्यालयात तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर ... उपलब्ध आहेत. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ४ सप्टेंबर २०२५ असून, अर्ज स्वीकारण्याची कालमर्यादा ५ ऑगस्ट २०२५ पासून सुरू होणार आहे. इच्छुक लाभार्थींनी आपले अर्ज बुलढाणा, चिखली, देऊळगाव राजा, सिंदखेडराजा, लोणार, मेहकर, मेहकर, मोताळा, नांदुरा, मलकापूर, खामगाव, शेगाव, जळगाव जामोद व संग्रामपूर या तालुक्यांतील एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयात वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

**आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा**

**बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..**



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | गुंतवणुक रक्कम ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

**ठेवींवरील आकर्षक व्याजदर**

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

**दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली**

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४



# डॉ वसंतरावजी संबारे सायकल बचत बँकेच्या माध्यमातून ग्रामीण विकास विद्यालयाच्या शेकडो विद्यार्थ्यांना सायकल वितरणाचा संकल्प आज पूर्ण

जनसंचलन/मलकापुर

अनेकांच्या सहकार्यातून व संकल्पनेतून लावण्यात येत असलेलं सायकल बचत बँक या नावाच रोपट अनेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मार्गात वटवृक्षाच्या सावली सारखं काम करेल ही आशा प्रज्वलित करून आज ग्रामीण विकास विद्यालय बेलाड या शिक्षण संस्थेने बेलाड मध्ये बाहेर गावा वरून येणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता, शिक्षण महर्षी स्व.डॉ वसंतरावजी संबारे सायकल बचत बँक ही संकल्पना पूर्णत्वास आणून गावाबाहेरील शेकडो विद्यार्थ्यांना सायकल वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला यावेळी



श्री एस पी बोरगावकर साहेब ( एम डी चैतन्य बायोलॉजिकल्स प्रा.लि ) यांच्या हातून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले श्री एन जे फाळके तर ( गटशिक्षणाधिकारी ) कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. तथा कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री गणेश गिरी साहेब, इंजि.सचिन तायडे साहेब, श्री नारायणदास निहलानी, श्री एडवोकेट प्रवीण भोळे, डॉ.नितीन बऱ्हाटे, श्री एन बी शिंदे, श्री अरुण संबारे, श्री विश्वासराव संबारे यांच्या सह शिक्षक वर्ग, सेकडो पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# पी एम सन्मान योजना ही शेतकऱ्यांप्रति केंद्र सरकारची असलेली बांधिलकी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव

जनसंचलन/बुलढाणा

शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे त्याला आर्थिक हातभार देण्याच्या दृष्टिकोनातून करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम किसान सन्मान योजना सुरू केली ही केंद्र सरकारची शेतकरी प्रति असलेली बांधिलकी असल्याचे प्रतिपादन केंद्रीय आयुष आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांना व्यक्त केले पी एम किसान सन्मान निधीचा विसावा हप्ता आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वितरित करण्यात आला त्यानिमित्य वाराणसी येथे मुख्य कार्यक्रम संपन्न झाला तर बुलढाणा येथील कृषी विज्ञान केंद्र येथे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थित एक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते यावेळी व्यासपिठावर कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ झापे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री मनोज ढगे, प्रकल्प संचालक आत्मा श्री पुरुषोत्तम उन्हाळे युवासेना नेते कुणल गायकवाड उपस्थित होते केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करता यावे . वेळेवर त्यांना पैसा उपलब्ध व्हावे या दृष्टिकोनातून पी एम किसान सन्मान योजना शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारच्या वतीने सुरू करण्यात आली आहे ही योजना देशातील अन्नदात्याच्या कष्टाचा हा सन्मान करणारी आहे पी एम किसान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना गरजेच्या वेळी आर्थिक मदत होते शेतीमध्ये लागणारे बी बियाणासाठी या रकमेचा उपयोग होतो ही शेतकऱ्यांसाठी लाभदायी योजना असल्याचे ही त्यांनी सांगितलं याशिवाय केंद्र सरकारच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविते त्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घेऊन आपली आर्थिक उन्नती करावी अस आवाहन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले या कार्यक्रमाला शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वनजमिनीवरील अतिक्रमणधारकांवर बोराखेडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा तर वनविभागांतर्गत वनगुन्हा दाखल

जनसंचलन/बुलढाणा

मोताळा तालुक्यातील माळेगावमधील वनजमिनीवरील अतिक्रमणधारकांवर बोराखेडी पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच वनविभागांतर्गत सुध्दा वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कार्यवाही नियमानुसार व कायद्याचे पालन करुन करण्यात आली आहे, अशी माहिती उपवनसंरक्षक सरोज गवस यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. दि. २३ जुलै २०२५ रोजी मोताळा वनपरिक्षेत्रांतर्गत मौजे मोहेगाव, राजुर वनपरिमंडळ, पूर्व खैरखेड बिटअंतर्गत वनखंड क्र.३२३ मध्ये अवैधरित्या केलेल्या झोपड्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यासाठी वनविभागाचे अधिकारी कर्मचारी, पोलीस अधिकारी कर्मचारी व महसूल अधिकारी, राज्य राखीव पोलीस तुकडी यांचेसह गेल्यावर झोपड्या व पाल काढत असतांना अचानकपणे १०० ते १५० लोकांच्या समुहाने येऊन कर्मचा-यावर दगडफेक, डोळ्यात मिरची पावडर फेकली व काठ्या, कोयता, कुऱ्हाडी याने प्राणघातक हल्ला केला होता. हा हल्ला केल्यावर त्या ठिकाणावरुन कर्मचारी वाहनात बसून बाहेर येत असतांना त्या वाहनांना घेरुन वाहनांवर हल्ला केला होता. यामध्ये वाहनांवर दगडफेक केल्याने वाहनांच्या काचा फुटल्या व त्यातील कर्मचारी गंभीर जखमी झाले होते. अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी आणलेल्या जेसीबीची तोडफोड केली होती. सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) मेहकर यांचे बोलेरो वाहनाची संपुर्ण तोडफोड करुन जाळुन देण्याचा प्रयत्न केला व इतर वाहने सुध्दा फोडण्यात आले. या हल्ल्यामध्ये वनविभागाचे ५ कर्मचारी (दोन महिला व तीन (पुरुष), पोलीस विभागाचे ८ कर्मचारी (६ महिला व २ पुरुष) व राज्य राखीव पोलीस दल तुकडी मधील १ जवान (पुरुष) हे गंभीररित्या जखमी झाले असुन या कर्मचाऱ्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालय, बुलढाणा येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले. या वनजमीनीवरील अतिक्रमणधारकांनी शेतीसाठी वनहक्क दावे दाखल केले होते. तथापि, घरासाठी दावे दाखल नव्हते. या शेतीच्या दाव्याबाबतचे जिल्हा वनहक्क समितीने सन २०२२ मध्ये वनहक्क दावे नामंजूर करण्यात आले होते. यानंतर दावेधारकांनी या दाव्यावर पुनर्विलोकन अर्ज केला व पुरावे सादर करण्यासाठी वेळ मागितला होता. यानुसार दाव्यावर जिल्हा वनहक्क समिती मार्फत पुनर्विलोकन करण्यात आले व यामध्ये सन २०२४ मध्ये सदर दावे पुन्हा नामंजूर करण्यात आले. यानंतर वन विभागामार्फत अतिक्रमण काढण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५३, ५४ अन्वये कार्यवाही करण्यात आली. यानुसार सहाय्यक वनसंरक्षक (प्रा व कॅम्पा) बुलढाणा यांनी माहे जानेवारी २०२५ ते फ ब्रुवारी-२०२५ कालावधीमध्ये अतिक्रमणधारकांना जमिनीवरचे सर्व पुरावेसह कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत पत्राने कळविले होते. यानुसार या कालावधीत वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) मोताळा व गैरअर्जदार अतिक्रमणधारक यांच्यात सुनावणी घेण्यात आली. अतिक्रमणधारकांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले पुरावे यांचा विचार करून सहाय्यक वनसंरक्षक यांनी सदर क्षेत्राबाबत अतिक्रमण निष्कसनाचे आदेश जारी करण्यात आले. अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करण्याअगोदर सदर क्षेत्र खाली/रिकामे करण्याबाबत व निघून जाण्याबाबत १५ दिवस अगोदर संबंधित अतिक्रमणधारकांना वैयक्तिकरित्या नोटीसद्वारे कळविण्यात आले होते.

# शेगाव बसस्थानकालगत बंद दुकानाला आग

जनसंचलन/ शेगाव




शहरातील बसस्थानक परिसरात सोमवार, ४ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास एका बंद दुकानाला अचानक आग लागली. दुपारी नेहमीप्रमाणे बसस्थानक परिसरात वर्दळ असताना अचानक एका बंद दुकानातून धूर येताना दिसल्याने नागरिकांनी तत्काळ याची माहिती प्रशासनाला दिली. वाहतूक नियंत्रक महेश पाटील आणि बसस्थानक व्यवस्थापिका शुभांगी पवार यांनी घटनास्थळी येत परिस्थितीचा आढावा घेतला आणि तातडीने अग्निशमन विभागाशी संपर्क साधला. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी सायबर कॅफे महा ई सेवा केंद्र होत दाखल आगीवर नियंत्रण मिळवले. काही वेळातच आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र दुकानाचे आंतरिक नुकसान झाले असून, आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले की, या घटनेचा पंचनामा करण्यात आला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८